REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 7 | APRIL - 2025

# ''पुणे जिल्ह्यातील राज्य कामगार विमा योजनेचा चिकित्सक अभ्यास''

दत्तु पोपट झेंडे
संशोधक विद्यार्थी ,
प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी,पुणे.

डॉ. निलेश दांगट
मार्गदर्शक

डॉ. बी. जी. लोबो
सहमार्गदर्शक
अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट, पुणे.

**प्रस्तावना :**

युरोप खंडात १८ व्या शतकात औद्योगिक क्रांतीने सामाजिक सुरक्षा या संकल्पनेस चालना दिली. अनेक लोक उदरनिर्वाहासाठी शहरांकडे आकर्षित झाले व कारखान्यात काम करू लागले. त्यावेळी कारखान्यांची स्थिती प्राथमिक अवस्थेत होती, वेतन कमी होते व कामाचे तास जास्त होते. अशावेळी अपघात, साथीचे रोग व निसर्गाची अवकृपा यामुळे माणसे मृत्युमुखी पडत, अपंग, निराधार होऊन आर्थिक व मानसिक दृष्ट्या खचून जात होती. त्यावेळी सामाजिक सुरक्षिततेची हमी समाजाने वा सरकारने घ्यावी अशी गरज निर्माण झाली. त्यामध्ये कामगार संघटनांनी पुढाकार घेतला त्याला पुढे जाऊन कायद्याचे संरक्षण प्राप्त होऊन युरोप खंडात सामाजिक सुरक्षिततेचे कायदे संमत होऊ लागले.




**व्याख्या :** सामाजिक सुरक्षा: आजार, बेकारी, अपंगत्व, वृद्धावस्था इत्यादी अडचणीत सहाय्य करण्यासाठी शासनाने केलेली सुरक्षतितेची तरतूद म्हणजे सामजिक सुरक्षा होय.

**इतिहास :**

भारताचे तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी २८ फेब्रुवारी १९५२ या ऐतिहासिक दिवशी राज्य कामगार विमा योजनेचे उद्घाटन केले. बिजेंद्र स्वरूप पार्क येथे पंडित जवाहरलाल नेहरू, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री गोविंद वल्लभपंत, केंद्रीय श्रममंत्री बाबु जगजीवन राम, केंद्रीय आरोग्यमंत्री राजकुमारी अमृत, केंद्रीय आहारमंत्री चंद्रभान गुप्त व कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे महानिर्देशक डॉ. सी. एल. कटियाल यावेळी उपस्थित होते. ही योजना उत्तर प्रदेश व दिल्ली या दोन ठिकाणी सुरू केली. राज्य कामगार विमा योजनेची सुरवात करताना ७०००० लोक उपस्थित होते. या योजनेला सुरूवात केल्यानंतर या योजनेमध्ये १२०००० कर्मचाऱ्यांनी नोंदणी केली. भारताचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू हे पहिले

मानद विमाधारक व्यक्ती होते, त्यांनी घोषणा पत्रावर सही केली. प्राध्यापक बी. पी. आडारकर एक प्रतिष्ठित, विद्वान आणि स्वप्नदेष्टाच्या नेतृत्वाखाली त्रिपक्षीय श्रम संमेलनामध्ये सामाजिक विमा वर प्रथम दस्तऐवज प्रस्तुत केला. सामाजिक सुरक्षा योजना या रिपोर्टचे भारतात स्वागत झाले. सरदार वल्लभभाई पटेल यांनी प्राध्यापक आडारकर यांना छोटा बेव्हरिज म्हणून संबोधले. सगळ्यांना माहित आहे की, सर विल्यम बेव्हरिज सामाजिक विम्याचे जनक आहेत. १९४६ पर्यंत म्हणजेच रिपोर्टचा स्वीकार करेपर्यंत प्राध्यापक आडारकर यामध्ये सक्रीय होते. यावेळी त्यांनी ILO च्या तज्ञांकडून ही योजना पूर्ण तपासून घेतली. १९४८ मध्ये इंग्लंडमध्ये भारतातील प्रख्यात डॉ. सी. एल. कटियाल यांच्यावर कर्मचारी राज्य विमा महामंडळाची महानिर्देशक म्हणून जबाबदारी सोपविली व ते १९५३ पर्यंत महानिर्देशक म्हणून कार्यान्वित होते. भारतात सामाजिक सुरक्षेसाठी २४ फेब्रुवारी हा दिवस महत्त्वपूर्ण समजला जातो. यानंतर या याजेनेने मागे वळून पाहिले नाही. कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे बोधचिन्ह हे प्रज्वलित दिवा असे आहे. ही योजना सत्याचे प्रतिक आहे. संकटकाळी मदत करून असंख्य कामगाराच्या घरात रोशनी आणते. आतापर्यंत ७३ वर्षे ही योजना निरंतर चालू आहे.[१]

## राज्य कामगार विमा महामंडळ :

स्वातंत्र्य भारतातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेवरील राज्य कामगार विमा योजना हा प्रमुख कायदा आहे. १९४८ च्या ESI कायद्याअंतर्गत कर्मचाऱ्यांना आजारपण, मातृत्व, अपंगत्व, तसेच रोजगाराच्या दरम्यान अपघात होऊन मृत्यू झाल्यास अशा अपघातापासून वाचविण्यासाठी अवलंबित्वाचा लाभ देणे तसेच विमाधारक व्यक्तींच्या कुटुंबांना वैद्यकीय सुविधा पुरविणे यासारखे कार्य करण्यासाठी योजनेची रचना केली आहे.

राज्य कामगार विमा योजना ही जिथे १० किंवा त्याहून जास्त कामगार काम करतात अशा कारखाने आणि इतर आस्थापनांना उदा. रस्ते व वाहतूक, हॉटेल्स, रेस्टॉरंट, सिनेमागृहे, वृत्तपत्र, दुकाने, खाजगी शिक्षण संस्था अशा ठिकाणी लागू होते. कारखाने तसेच आस्थापनांचे जे कामगार २१००० रुपये पर्यंत पगार घेतात, ते ईएसआय योजनेच्या कक्षेत येतात या योजनेअंतर्गत कर्मचाऱ्याच्या देय वेतनाच्या ०.७५ टक्के योगदानाची रक्कम पगारातून कपात होते, तर नियोक्ता सदर कर्मचाऱ्याच्या देय वेतनाच्या ३.२५ टक्के योगदान देतात. दैनंदिन मजूरी म्हणून रुपये १७६ पेक्षा कमी कमाई करणाऱ्या कामगारांना त्यांच्या योगदानातून सूट देण्यात आलेली आहे.

## ईएसआय योजनेच्या लाभाचा थोडक्यात आढावा :

राज्य कामागर विमा योजनेअंतर्गत विमाधारक व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबियांना योजनेंतर्गत मोफत आणि व्यापक वैद्यकीय सेवेसह रोख लाभ मिळण्याचा अधिकार आहे. या योजनेअंतर्गत मिळणारे लाभ पुढीलप्रमाणे-

**१) आजारपणाचा लाभ :** कर्मचारी कामावर अनुपस्थित असताना प्रमाणित आजाराच्या काळात विमाधारक व्यक्तीला वेळोवेळी रोख रक्कम दिली जाते. त्याला आजारपणाचा लाभ म्हणतात. याचे तीन प्रकार आहेत.

**अ) आजारपणाचा लाभ :** योगदान कालावधीमध्ये ७८ दिवसांचे योगदान भरलेल्या विमाधारकाला दैनंदिन वेतनाच्या ७०% दराने सलग दोन हितलाभ कालावधीमध्ये ९१ दिवसांपर्यंत आजारपणाचा लाभ मिळतो.

**ब) विस्तारित आजारपणाचा लाभ :** सलग चार कालावधीत १५६ दिवसांच्या योगदानासह दोन वर्षासाठी सतत विमापात्र रोजगार असणाऱ्या विमाधारक व्यक्तीला ३४ निर्दिष्ट दिर्घकालीन आजारासाठी सरासरी दैनंदिन वेतनाच्या ८०% दराने १२४ दिवसापासून दोन वर्षापर्यंत विस्तारीत आजारपणाचा लाभ मिळतो.

**क) वर्धित आजारपणाचा लाभ :** सलग्न योगदान कालावधीत ७८ दिवसांचे योगदान भरलेल्या विमाधारक व्यक्तीला सरासरी देय वेतनाच्या १००% दराने महिला नसबंदीसाठी १४ दिवस व पुरुष नसबंदीसाठी ७ दिवस वर्धित आजारपणाचा लाभ मिळतो.

**२) अपंगत्वाचा लाभ :**

**अ) तात्पुरते अपंगत्वाचा लाभ :** विमापात्र रोजगारात प्रवेश केल्याच्या पहिल्या दिवसापासून सरासरी देय वेतनाच्या ९०% दराने तात्पुरते अपंगत्व असेपर्यंत अपंगत्वाचा लाभ दिला जातो.

**ब) कायम स्वरूपी अपंगत्वाचा लाभ :** विमापात्र रोजगारात प्रवेश केल्याचा पहिल्या दिवसापासून सरासरी दैनंदिन वेतनाचा ९०% दराने वैद्यकीय मंडळाने निर्धारित केल्यानुसार संपूर्ण आयुष्यासाठी किंवा अपंगत्व असेपर्यंत दिला जातो.

**३) मातृत्व लाभ :** देय योगदान अवधीमध्ये ७० दिवसांचे योगदान दिलेल्या महिला विमाधारकाला सरासरी दैनंदिन वेतनाच्या १००% दराने प्रसूती असल्यास २६ आठवडे व गर्भपात झाल्यास ६ आठवडेपर्यंत मातृत्वाचा लाभ मिळतो.

**४) अवलंबित्वाचा लाभ :** रोजगारातून प्रवेश केल्याच्या पहिल्या दिवसापासून रोजगारात दुखापतीमुळे विमाधारकाचा मृत्यू झाल्यास वेतनाचा ९०% दराने विधवेच्या आयुष्यासाठी किंवा पुर्नविवाह पर्यत विमाधारकाच्या विधवा पत्नीला/अवलंबित्वाला अटीनुसार अवलंबित्वाचा लाभ दिला जातो.

**५) वैद्यकीय लाभ :** विमापात्र रोजगारात प्रवेश केल्याच्या पहिला दिवसापासून विमाधारक व्यक्ती व त्यांच्या कुटुंबियांना मोफत वैद्यकीय सेवा दिली जाते. यासाठी कोणत्याही खर्चाची मर्यादा नाही.

**६) इतर लाभ :**

**१) प्रसूती खर्च :** विमाकृत महिला व्यक्ती किंवा विमाकृत व्यक्तीच्या पतीला जर प्रसूतीसाठी याजेनेच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसतील तर केवळ दोन प्रसूतीपर्यंत एक रक्कमी ७५०० रुपये प्रसूती खर्च दिला जातो.

**२) सेवानिवृत्तीनंतर लाभ :** विमाधारक व्यक्ती व जोडीदारासाठी वार्षिक १२० रुपये योगदान भरून अटीसह वैद्यकीय लाभ घेऊ शकतात.

**३) अत्यंविधी खर्च :** रोजगारात प्रवेश केल्याच्या पहिल्या दिवसापासून विमाकृत व्यक्तीचा सेवाकाळात मृत्यू झाल्यास अंत्यसंस्काराच्या वेळी झालेला वास्तविक खर्च किंवा कमाल १५००० रुपये अत्यंविधी खर्च म्हणून दिला जातो.

**४) राजीव गांधी श्रमिक कल्याण योजना :** कमीत कमी ३ वर्ष योगदान भरलेल्या विमाधारक व्यक्तीला कारखाना बंद पडल्यामुळे/कामगार कपातीमुळे/कायमस्वरूपी अपंगत्व किंवा अनैच्छिक कारणामुळे नोकरी गेल्यास वेतनाच्या ५०% दराने आयुष्यात एकदाच २४ महिन्यापर्यंत बेरोजगारीचा भत्ता दिला जातो.

**५) व्यावसायिक प्रशिक्षण :** रोजगारात दुखापतीमुळे आलेल्या शारीरिक अपंगत्वाच्या परिस्थितीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण चालू असेपर्यंत रुपये १२३ दररोज किंवा जो अधिक असेल तो व्यावसायिक प्रशिक्षण भत्ता दिला जातो.

**६) शारीरिक पुर्नर्वसन :** नोकरीतील दुखापतीमुळे आलेल्या शारीरिक अपंगत्वाच्या परिस्थितीमध्ये सरासरी दैनंदिन वेतनाच्या १००% दराने कृत्रिम अंग किंवा केंद्रात दाखल असेपर्यंत शारीरिक पुर्नर्वसन भत्ता दिला जातो.

**७) अटल बिमित व्यक्ती कल्याण योजना :** विमाधारक व्यक्तींची अचानक नोकरी गेल्यास एक वर्ष योगदान दिल्यास सरासरी दैनंदिन वेतनाच्या ५०% दराने ६० दिवसापर्यंत बेरोजगरीचा लाभ दिला जातो.[२]

## संशोधन विषयाची निवड :

स्वातंत्र्योत्तर भारतात शासकीय सहकार्यावर अधिकाधिक अवलंबून राहण्याची लोकांची प्रवृत्ती वाढीस लागली. त्यातच व्यापक सामाजिक दृष्टीकोनातून कामगार राज्यविमा योजनेचा पाया घातला गेला व त्यामध्ये कर्मचारी राज्य कामगारांना आणि त्यांच्या आश्रित लोकांना सामाजिक सुरक्षा पुरविण्याची ही महत्त्वपूर्ण योजना आखली गेली. तिची उद्दिष्टे कोणती, योजनेची उद्दिष्टे साध्य झाली की नाहीत व योजनेची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत आहे का? इत्यादी बाबींचा आढावा घेण्यासाठी 'पुणे जिल्ह्यातील राज्य कामगार विमा योजनेचा चिकित्सक अभ्यास' हा संशोधनासाठी विषय निवडला आहे.

राज्य कर्मचारी विमा महामंडळाच्या विविध योजनांचा अभ्यास, योजनेचे विमाधारक व लाभार्थी, महामंडळातर्फे पुरविल्या जाणाऱ्या सेवा, विविध सामाजिक सुरक्षा फायदे, विमाधारक व लाभार्थींच्या काय समस्या आहेत हे जाणून घेण्यासाठी पुणे जिल्ह्यातील राज्य कामगार विमा योजनेची संशोधन विषयासाठी निवड करण्यात आली आहे.

## संशोधन विषयाचे महत्त्व :

सन २०२३-२४ मध्ये कामगार राज्य विमा योजनेची देशात ६२८ केंद्रे असून त्यांच्या कक्षेत १६५ हॉस्पिटल आहेत. या योजनेचा फायदा ३ कोटी ७२ लाख कामगारांना व १४ कोटी ४३ लाख त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांना मिळालेला आहे. तर

सन २०२१-२२ मध्ये पुणे जिल्ह्यातील १६ केंद्रातील १० लाख ६४ हजार कामगारांना त्यांचा फायदा झालेला आहे. त्यामुळे वरील आकडेवारी पाहता संशोधन विषयाला महत्त्व प्राप्त होते.

थोडक्यात, सामाजिक सुरक्षांच्या दृष्टीने राज्य कामगार विमा योजनेचा अभ्यास कमी झाल्याचे दिसून येते. ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न या अभ्यासामध्ये करण्यात आलेला आहे. म्हणून प्रस्तुत अभ्यासाला महत्त्व प्राप्त होते.

## संशोधन विषयाची उद्दिष्टे :

१) राज्य कामगार विमा योजनेच्या प्रगतीच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
२) पुणे जिल्ह्यातील राज्य कामगार विमा योजनेच्या सन (२००६-०७ ते २०१५-१६) उपलब्ध निधी व खर्चाचा अभ्यास करणे.
३) राज्य कामगार विमा योजनेचे शहरी व ग्रामीण विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.
४) पुणे जिल्ह्यातील राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत विमाधारकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
५) राज्य कामगार विमा योजनेच्या उणिवांचा अभ्यास करणे व उपाययोजना सुचविणे.

## संशोधन विषयाची गृहितके :

१) पुणे जिल्ह्यात राज्य कामगार विमा योजनेची प्रगती होत आहे.
२) राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत विमाधारकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत बदल झाला आहे.

## संशोधन पद्धती :

### नमुना निवड :

''संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचे अध्ययन करताना जेव्हा विशिष्ट घटकांची पदसंख्या खूपच अधिक असते. तेव्हा प्रत्येकाचा स्वतंत्र अभ्यास करणे शक्य नसते. तेव्हा अशा सर्व चलांमधून त्या विशिष्ट चलांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काही निवडक चलांची निवड करावी लागते व त्या निवडलेल्या चलांचा अभ्यास करूनच आलेले निष्कर्ष संपूर्ण घटकाला किंवा त्या गटाला लागू केले जातात. अशा पद्धतीला नमुना निवड पद्धत असे म्हणतात.''

**तक्ता क्रमांक १.१ पुणे जिल्ह्यातील विमा केंद्रे व विमाधारकांची संख्या (२०१४-१५)**

| अ. क्र. | विमा केंद्राचे नाव | विमाधारक |
|---|---|---|
| १ | पुणे (स्वारगेट) | ९३७०१ |
| २ | बिबवेवाडी | ६५२६८ |
| ३ | नगररोड | ४७९६६ |
| ४ | चिंचवड | ४१४७१ |
| ५ | हडपसर | ३३४६५ |
| ६ | खडकी | ३२४८६ |
| ७ | आकुर्डी | २९१४५ |
| ८ | पिंपरी | २२९१४ |
| ९ | भोसरी | १५८७८ |
| १० | इलेक्ट्रीक सदन | १३९११ |
| ११ | बाणेर रोड | ९८८० |
| १२ | लोणावळा | ४७१४ |
| | **एकूण** | **४१०७९९** |

संदर्भ : उप-प्रादेशिक कार्यालय, पुणे-सन २०१४-१५. [३]

वरील तक्ता क्रमांक १.१ मध्ये पुणे जिल्ह्यातील विमा केंद्रे व विमाधारकांची संख्या दर्शविली आहे. पुणे जिल्ह्यामध्ये २०१४-१५ या वर्षात एकूण १२ विमा केंद्रे असून त्यामध्ये एकूण ४१०७९९ विमाधारक आहेत.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने पुणे जिल्ह्यातील राज्य कामगार विमा महामंडळाच्या १२ शाखा कार्यलयातून विमाधारकांची स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड केलेली असून एकूण १२ केंद्रापैकी पहिल्या पाच केंद्राची निवड करण्यात आली आहे. नमुना निवड केलेल्या केंद्राची नावे व विमा धारकांची संख्या पुढील प्रमाणे :

**तक्ता क्रमांक १.२ नमुना निवड केलेली केंद्रे व विमाधारक(२०१४-१५)**

| अ.क्र. | केंद्राचे नाव | विमाधारकांची संख्या | नमुना निवडलेल्या विमाधारकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | पुणे (स्वारगेट) | ९३७०१ | १०० |
| २ | बिबवेवाडी | ६५२६८ | १०० |
| ३ | नगररोड | ४७९६६ | १०० |
| ४ | चिंचवड | ४१४७१ | १०० |
| ५ | हडपसर | ३३४६५ | १०० |
| | एकूण | २८१८७१ | ५०० |

संदर्भ : उप-प्रादेशिक कार्यालय पुणे, सन २०१४-१५.[४]

वरील तक्ता क्रमांक १.२ मध्ये पुणे जिल्ह्यातील विमाधारकांची सर्वांत जास्त संख्या असलेली पाच केंद्रे अभ्यासासाठी स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड लेली आहेत. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक विमाधारकांची संख्या पुणे, बिबवेवाडी, नगररोड, चिंचवड व हडपसर या पाच केंद्रांमध्ये आहे. पुणे जिल्ह्यातील १२ केद्रातील एकूण विमाधारकांची संख्या ४१०७९९ इतकी असून त्यापैकी पाच केंद्रात विमाधारकांची संख्या २८१८७१ एवढी आहे. ही संख्या एकूण विमाधारक संख्येच्या ६८.६१ टक्के इतकी आहे. नमुना निवडीसाठी निवडण्यात आलेल्या पाच केंद्रामध्ये २८१८७१ इतकी विमाधारकांची संख्या असून त्यापैकी प्रत्येकी १०० विमाधारकांची निवड केलेली असून या पाच केंद्रांमधून एकूण ५०० विमाधारकांची संशोधनासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आलेली आहे.

## दुय्यम सामग्री :

प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, अहवाल, अभिलेख, पत्र, दैनंदिनी, नियतकालिके, इत्यादींमधून जमा केलेली तथ्य म्हणजे दुय्यम स्त्रोत होय. या माध्यमाद्वारे संशोधकाला आपल्या संशोधन समस्ये संबंधित अनेक महत्त्वपूर्ण तथ्य व आकडे प्राप्त होतात. दुय्यम स्त्रोतांचा विशेष गुणधर्म असा की, तथ्ये अथवा आकडे स्वतः संशोधकांची नसून ती कोणत्या तरी व्यक्तीची किंवा संस्थेची किंवा शासनाच्या मालकीची असतात. संशोधकाने अशा प्रकारची तथ्ये गोळा करून त्याचा संशोधन कार्यासाठी उपयोग केलेला. संशोधकाने तथ्य संकलनासाठी खालील दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे.

### १) पाचघरे नवदीप (१९८७) :

यांनी राज्य कामगार विमा योजना या पुस्तकात राज्य कामगार विमा योजनेची सविस्तर माहिती दिलेली आहे. राज्य कामगार विमा कायदा, योजनेची व्याप्ती आणि मर्यादा, योजनेची वैशिष्ट्ये, योजनेअंतर्गत मिळणारे लाभ व त्यांचे नियम याचा उल्लेख केला असून या पुस्तकाद्वारे योजनेचे महत्त्व व लाभ अधिक स्पष्ट होतात.[५]

### २) चेलासामी पी. आणि लीग व्ही. के.(२०१२):

यांनी 'केरळमधील ईएसआय योजनेबद्दल कर्मचाऱ्यांची जागरूकता' या विषयावर संशोधन पेपर प्रकाशित केलेला आहे. आरोग्य सेवा सुधारण्यासाठी आणि समाजातील दुर्बल घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी भारत सरकारने अनेक विमा योजना सुरू

केल्या आहेत. राज्य कर्मचारी विमा याजेना ही स्वातंत्र्यानंतर कर्मचाऱ्यांना सामाजिक, आर्थिक संरक्षण देणारी भारतातील पहिली सामाजिक वित्त योजना आहे. आणि ती कर्मचारी राज्य विमा महामंडळाद्वारे नियंत्रित केली जाते. राज्य विमा योजना ही सामाजिक सुरक्षेच्या उपायांपैकी एक आहे. आणि अनेक लहान संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याची काळजी घेण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.[६]

### ३) पुरी एस. डी. (२०१७) :

यांनी १८४८ च्या राज्य कामगार विमा कायदा या पुस्तकात कायद्याची सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच कायद्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांचा आढावा या पुस्तकात घेण्यात आला आहे. या पुस्तकात राज्य कामगार विमा महामंडळाची रचना, योजनेचे लाभ व त्याची नियमावली तसेच दंड व शिक्षा यांची सविस्तर माहिती मिळते.[७]

### ४) थोरात दत्तात्रय (२०१८) :

यांनी कामगार विषयक कायदे : एक दृष्टीक्षेप या संशोधन पेपरमध्ये कामगार विषयक कायद्यांची तत्वे, कामगार विषयक कायदे यांची सविस्तर माहिती दिली आहे. कामगार हा आधुनिक समाजातील दुर्बल व शोषित घटक आहे. औद्योगिकरणात कामगारांचे शोषण होत असल्याने कामगार वर्गाच्या कल्याणाची जबाबदारी घेणे भाग पडते. संशोधकाने आपल्या संशोधन पेपरमध्ये सन १९४८ चा कामगार राज्य विमा कायदा याबाबत सविस्तर विवेचन केलेले आहे. या कायद्यातील सर्वात महत्त्वाची तरतूद अशी आहे की, विमाधारक कामगाराला व त्यांच्या कुटुंबाला सर्व प्रकारचे वैद्यकीय फायदे मिळतात. तसेच त्यांच्यावर मोफत औषधोपचार व इतर वैद्यकीय इलाज केले जातात. जर कामगार कामावर असताना अपघातामुळे किंवा एखाद्या रोगामुळे त्यांना नोकरी करणे कायमचे अशक्य झाल्यास त्याला नुकसान भरपाई देण्यासंबंधीच्या तरतुदी या कायद्यात आहेत.[८]

## निष्कर्ष :

१) राज्य कामगार विमा योजना ही भारतातील संघटित व असंघटीत क्षेत्रातील कामगार किंवा कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाची सामाजिक सुरक्षा योजना आहे. ती केवळ वैद्यकीय मदत देत नाही तर आर्थिक अडचणीच्या काळात मदतीचा आधार ठरते. कामगारांना आजार, अपंगत्व, प्रसूती, बेरोजगारी आणि मृत्यूच्या परिस्थितीत आर्थिक मदत व आरोग्य सेवा प्रदान करते. या योजनेत विमाधारक
व्यक्तीला व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय उपचारासाठी कोणतीही मर्यादा नाही.

२) पुणे जिल्ह्यातील विमाधारकांची संख्या पाहता हॉस्पिटलची संख्या कमी असून त्यात वाढ करणे गरजेचे असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते.

३) कमी उत्पन्न असणाऱ्या संघटित व असंघटित कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सेवा काळात व सेवानिृत्तीनंतरही कमी किंमतीत आरोग्य सेवा देणारी देशातील एकमेव योजना आहे.

## संदर्भसूची :


१) कुलकर्णी एस. के. कर्मचारी राज्य विमा योजना ऐतिहासिक आणि प्रशासकीय दृष्टीक्षेप, साहित्य प्रकाशन, नागपूर, २०१०.

२) वेबसाईट : www.esic.nic.in

३) राज्य कामगार विमा योजना प्रादेशिक कार्यालय, पुणे-२०१४-१५.

४) राज्य कामगार विमा योजना, उपप्रादेशिक कार्यालय, पुणे-२०१४-१५.

५) पाचघरे नवदीप, राज्य कामगार विमा योजना, नवदीप पाचघरे प्रकाशन, नागपूर, १९८७.

६) चेल्लास्वामी पी. आणि लीग व्ही. के., केरळमधील ईएसआय योजनेबद्दल कर्मचाऱ्यांची जागरूकता, संशोधन पेपर, International Conference on Business Research, 2012, pp. 125, 126
७) पुरी एस. डी., १९४८ कामगार राज्य विमा कायदा, स्नो व्हाईट प्रकाशन, मुंबई, २०१६.
८) थोरात दत्तात्रय, कामगार विषयक कायदे-एक दृष्टीक्षेप, संशोधन पेपर, Review of Research, ISSN, 2249-894X, Impact Factor, 5-2331 UIF, Jan. 2018, pp. 1,2.